राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ :- ५८२१ / २०२३/ सांगली

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| दशरथ पेदाण्णा बल्लारी | कर निर्धारण व प्रशासकीय अधिकारी, जत नगरपरिषद जत, ता.जत, जि.सांगली | मुख्याधिकारी, जत नगरपरिषद जत, ता.जत, जि.सांगली |

( सुनावणी दिनांक - १८/०६ /२०२५ )

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि.१६.०९.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत. अपिलार्थी ऑनलाईन हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपीलार्थी यांनी दि.२०.०४.२०२३ च्या माहिती अर्जात "जत नगरपरिषदेच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनाच्या अनुषंगिक सर्व १ ते ३ मुद्यांची माहिती मागितलेली आहे."

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, "माहिती अर्धवट मिळाली आहे."

आज रोजी सुनावणी दरम्यान जनमाहिती अधिकारी यांचे प्रतिनिधींनी अवगत केले की, "अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाची असलेने दिली नाही."

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, "अपिलार्थी यांनी जत नगरपरिषदेच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या सन २००३ ते २०२२ या कालावधीतील मासिक वेतनाची मागणी केली आहे.सदर माहिती

विस्तृत असून दिर्घ कालावधीची आहे. सदर माहितीवरुन कोणतेही सार्वजनिक हित साध्य होत नसलेने सदर द्वितीय अपिल फेटाळण्याबाबत आयोगाचे स्पष्ट मत होत आहे."

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

प्रस्तुतचे द्वितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ५८२१ / २०२३ / सांगली 9150/2025 दिनांक - 2/9/2025